स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

भाषा वाङ्‌:मय व संस्कृती अभ्यास संकुल मराठी विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरिता सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा

★संशोधन विषय★

“एकविसाव्या शतकातील स्त्री लिखित निवडक काव्यातील कृषी जाणिवा : एक अभ्यास”

★ संशोधन केंद्र ★

श्री. हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर

संशोधक

श्री. पाटील पांडुरंग नारायण

मु.पो. तांबवे ता. वाळवा जि. सांगली

पिन कोड नं. 415 404

संवर्ग - खुला

मो. नं. 9665914147

ईमेल आयडी. :- Pandurangpatil15676@gmail.com

मार्गदर्शक

प्रा. डॉ. म. ई. तंगावार

सहाय्यक प्राध्यापक मराठी विभाग

श्री. हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर

मो. नं. 9890065690

ईमेल आयडी. **:- metangawar@gmail.com**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"एकविसाव्या शतकातील स्त्री लिखित निवडक काव्यातील कृषी जाणिवा : एक अभ्यास"

संशोधक

श्री. पांडुरंग नारायण पाटील

एम.ए. सेट (मराठी)

मु. पो. तांबवे ता. वाळवा जि. सांगली

मो. नं. 9665914147

मार्गदर्शक

प्रा. डॉ. म. ई. तंगावार

एम.ए. पीएच.डी. नेट (मराठी)

सहाय्यक प्रा. मराठी विभाग व संशोधन मार्गदर्शक

श्री. हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर, जि. लातूर

मो. नं. 9860065690

अनुक्रमणिका

अ.नं.	**तपशिल**	**पान नं.**
1	प्रस्तावना	3
2	संशोधनाचे महत्तव	4
3	मर्यादा व व्याप्ती	5
4	गृहितके	5
5	संशोधन पद्धती	5
6	उद्दिष्टे	6
7	विषयाची रूपरेषा प्रकरण निहाय	6
8	आधारभूत कविता संग्रहाची सूची	8
9	संदर्भ ग्रंथ सूची	9

प्रस्तावना :-

मराठी कृषी संस्कृतीचे दर्शन मौखिक व लिखित साहित्यातून प्रतिबिंबीत होते. काव्यात्मकता हा तिचा विशेष गाभा होय. परंपरेतील लोकगीतानी समाजमनावरती एक वेगळीच परिणामकारकता साधली होती. असे दिसून येते. काव्यात्मक रचनांची लोकगीते, कृषीगीते, जात्यावरील ओवी, सण-उत्सव गीते, आख्यायिका आणि लोकसंस्कृतीचे उपासक यांच्यातून काव्यात्मक जाणिव प्रकट होताना दिसते. ही काव्यात्मक जाणिव प्रदीर्घ परंपरेशी जोडलेली दिसते. कारण तिचे एक नाते प्राचीन महाकाव्याशी असल्याचे दाखविता येते. प्रत्येक कलाकृतीमध्ये जीवनानुभती व्यक्त होत असते. प्रत्येक कविची जीवन जाणिव ही कवितेच्या केंद्रस्थानी असते. काळानुरुप प्रत्येक कलाकृतीमध्ये एक जाणिव नवा जन्म घेताना दिसते. तिचे अविष्कार संदर्भ काळानुरुप असतात. ती जाणिव काव्यात्मक रुपाने अविष्कृत होते. पुर्वपरंपरा लाभलेली मौखिक व साहित्यिक एक जाणिव म्हणजे कृषी जाणिव होय.

कृषी संस्कृतीतील स्त्रीचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. कुटुंब, नाती-गोती, शेती-भाती, जपणारी स्त्री. तिचे भावविश्व मौखिक स्वरुपात जात्यावरील ओवी, शेतातील कामे करताना तसेच सण-उत्सवात पारंपारीक पद्धतीने मांडत असे. लिखित स्वरुपातील कृषी विषयक जाणिवेचा शोध घ्यावयाचे म्हटले तर ती म. फुले यांच्यापासून सुरु होते. परंतु स्त्रीचे कृषीविषयक भावविश्व कवियत्री बहिणाबाई यांच्या काव्यापासून उगम पावते.

स्वातंत्र्यपुर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील ग्रामीण कवितेत आशय व अभिव्यक्तीत बदल घडून आलेला दिसून येतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शिक्षणाचे वारे खेड्यापाड्यात जाऊन पोहचले. त्यांच्या कष्टमय जीवनात ज्ञानरुपी पहाट उजाडली. सरकारने स्त्री शिक्षण सक्तीचे व मोफत केल्याने ग्रामीण जीवनातील अनेक स्त्रीयांना शिक्षण मिळाले. त्यांच्याठिकाणी ज्ञानाने आत्मभान, आत्मसन्मान आणि आत्मविश्वास जागा झाला. त्यातूनच स्वत:च्या आस्तित्वाच्या पाऊलखुणा शोधण्याचा मार्ग सुरु झाला. परिणामी, स्त्रीविषयक जाणिवा प्रकर्षाने समोर येऊ लागल्या. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ग्रामीण कविता

अधिक फुलत गेली. तुलनेने स्त्रीयांनी ग्रामीण कविता थोड्या लिहिल्या असल्या तरी तिचे जगण्यातील भावविश्व वेगळेच आहे. एकविसाव्या शतकातील स्त्री अधिक जागरुक झालेली पाहवयास मिळते. कारण, तिला मिळालेले शिक्षण आणि पुरुषांच्या बरोबरीने घटनेकडून मिळालेले हक्क यामुळे तिचे वेगळेच भावविश्व, जगणे मराठी ग्रामीण कवितेत आलेले दिसून येते. एकविसाव्या शतकातील स्त्री कवियत्रीनी आपले वेगळेच विषय आणि अभिव्यक्ती मध्ये आमूलाग्र बदल घडवून आलेला दिसतो. जागतिकीकरण, महागाई, बेरोजगारी, शेतीमालास भाव नसणे, नैसर्गिक संकटे, शेतकऱ्यांची आत्महत्या, कारखानदार व व्यापारी यांच्याकडून होणारे शोषण, विभक्त कुटुंब पद्धती, मुलांचे शिक्षण, पिकांवरील रोगराई व बी-बीयाणे यांतील फसवणूक या सर्व प्रश्नांना आणि आपल्या कष्टमय जीवनाला आपल्या काव्यातून वाचा फोडू लागली. स्त्री म्हणून तिच्या आस्तित्वाचा शोध ती घेऊ लागली, आपले जगणे ती काव्यातून मांडू लागली. संसारात पतीबरोबर किंवा पती निधनानंतर आलेल्या समस्या तिने काव्यातून उलघडून दाखविण्यास सुरुवात केलेली पहावयास मिळते. मराठी ग्रामीण कवितेतील स्त्री लिखित काव्यातील कृषी जाणिवांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्याचे निश्चित केले आहे.

संशोधनाचे महत्तव :

ग्रामीण मराठी स्त्री लिखित काव्याची सुरुवात कवियत्री बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेपासून झालेली दिसून येते. अर्थात, मौखिक परंपरा तिला लाभलेली होतीच. स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण कविता ही अधिक सकसपणे लिहू लागलेले कवी आनंद यादव यांनी ग्राम जाणिव अधिक प्रभावी मांडली. प्रस्तुत विषयाचा विचार करता कृषीजीवन संस्कृती आणि त्यामधील स्त्री भूमिका अतिशय महत्वपूर्ण वाटते. एकविसाव्या शतकातील स्त्री ही शिक्षणाने प्रेरीत असणारी आहे, त्यामुळे तिने आपल्या कवितेतील आशय व अभिव्यक्तीमध्ये फार मोठा बदल केलेला पहावयास मिळतो. कृषी संस्कृतीचे जतन करताना तिने आपल्या जीवनानुभूतीला काव्यातून वाट मोकळी करून दिली आहे. जागतिकीकरणाचा परिणाम, कुटुंब, सामाजिक शोषण, बेरोजगारी, कष्टप्रद जीवन, दारिद्रय, मुलांचे संगोपन, मुलांचे शिक्षण,

निसर्गातील बदल, शेतकरी आत्महत्या, बदलते सामाजिक जीवन, सोशल मिडीयाचा प्रभाव, स्त्रीचे दुय्यम स्थान, श्रमिक म्हणून मिळालेली सामाजिक मान्यता यांसारखे असंख्य प्रश्न तिच्या कवितेचे विषय बनले आहेत. या सर्वांचा अभ्यास 'एकविसाव्या शतकातील स्त्री लिखित कवितेतील कृषी जाणिवा म्हणून अभ्यास होणे गरजेचे वाटते. आजपर्यंत स्त्री लिखित कवितेचा समिक्षात्मक अभ्यास पाहिजे त्या प्रमाणात झाला नसल्याने कृषीमूल्य व्यवस्थेतील जीवन जाणिवांचे संशोधन करणे. तसेच, स्त्रीयांच्या कृषी जाणिवांचा बदलाने काळानुसार आलेले संदर्भ यांचा अभ्यास करणे. स्त्रीयांचे मराठी ग्रामीण कवितेतील योगदान यांचा अभ्यास केला जाणार आहे. हा अभ्यास मराठी ग्रामीण कवितेच्या अभ्यासामध्ये आणि मराठी समिक्षेच्या दृष्टीने एक मौलिक विचार स्पष्ट करेल असा आशावाद वाटतो.

मर्यादा व व्याप्ती :-

मराठी साहित्यातील आजपर्यंत लिहिलेली स्त्री लिखित ग्रामीण कविता ही तिची व्याप्ती आहे. त्याच बरोबर एकविसाव्या शतकातील स्त्री लिखित कवितेतील (निवडक) कृषी विषयक जाणिवा ही तिची मर्यादा आहे. संशोधनात नेमकेपणा, सुक्ष्मपणा यावा यासाठी ही मर्यादा स्विकारली आहे. एकविसाव्या शतकातील स्त्री लिखित ग्रामीण कवितांचा अभ्यास या संशोधनात असेल.

१. प्रस्तुत अभ्यास फक्त 'स्त्री लिखित' ग्रामीण कवितेशी संबंधीत आहे.
२. प्रस्तुत अभ्यास हा एकविसाव्या शतकातील स्त्री लिखित ग्रामीण कवितेच्या कालखंडाशी संबंधीत आहे.
३. प्रस्तुत अभ्यास हा स्त्री लिखित कवितेतील कृषी जाणिवेशी संबंधीत आहे.
४. प्रस्तुत अभ्यास हा स्त्री लिखित कवितेतील बदलते कृषी जाणिवांचा काव्यगुणांशी संबंधीत आहे.

गृहीतके :-

१. स्त्रीचे कृषी संस्कृतीतील महत्तव सिद्ध करणारे आहे.

२. स्त्रीचे भावविश्व समृद्ध करणे, तिचे जगण्यातील वेगळेपण सिद्ध करणे व त्यास प्रेरणा देणे आहे.

३. बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे स्त्री जीवनाचे बदलते संदर्भ शोधता येईल.

४. कृषी संस्कृतीमध्ये स्त्री आणि पुरुष हे परस्पर पूरक आहेत. या अभ्यासावरून समजेल.

५. कृषी जाणिवेतून व्यक्त होणारे जीवनमानाचा अभ्यास करता येईल.

६. कवियत्री निहाय काव्यप्रवृत्ती, प्रेरणा आणि स्वरुपाचा विचार अभ्यासता येईल.

संशोधन पद्धती :-

एकविसाव्या शतकातील स्त्री लिखित निवडक काव्यातील कृषी विषयक जाणिवांचा अभ्यास या शोध प्रबंधासाठी वर्णनात्मक, विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. काही निवडक कवियत्रींच्या मुलाखती घेतल्या जातील. स्त्री लिखित कवितेतील कृषी जाणिवांचा अभ्यास करताना बदलत्या कृषीसंस्कृतीच्या दर्शनावरती प्रकाश टाकता येईल.

उद्दिष्टे :-

१. एकविसाव्या शतकातील स्त्री लिखित निवडक कवितेतील कृषी जाणिवांचा अभ्यास करणे.

२. तत्कालीन सामाजिक परिस्थिती त्यातील स्त्री जीवनाचे घडणारे दर्शन अभ्यासणे.

३. ‘स्त्री’ म्हणून तिचे भावविश्व काव्यातून कसे प्रतिबिंबित झाले आहे हे अभ्यासणे.

४. स्त्री कवितेतील कृषी जाणिवा व तिचे महत्व अभ्यासणे.

विषयाची रूपरेषा :-

अभ्यासाच्या सोयीच्या दृष्टीने या प्रबंधातील अभ्यास विषयाची मांडणी पुढील प्रकरणांमध्ये केली आहे.

प्रकरण पहिले :- मराठी साहित्यातील स्त्री लिखित ग्रामीण कवितेची पूर्वपरंपरा

प्रस्तुत प्रकरणामध्ये मराठी साहित्यातील ग्रामीण कवितेचा उदय व विकास. स्त्री कवितेतील कृषी जाणिवांच्या संदर्भातील काव्य लिखाणाची पुर्वपरंपरा यांचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच, या प्रकरणामध्ये स्त्री लिखित कवितेतील कृषी जाणिवांचे ग्रामीण साहित्यातील महत्वपूर्ण योगदान तपासण्यात येणार आहे. मराठी साहित्यातील स्त्री लिखित कवितेतील कृषी जाणिवांचे प्रारंभिक स्वरुप याची चर्चा करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे :- स्त्री लिखित ग्रामीण कवितेचे स्वरुप

प्रस्तुत प्रकरणामधून स्त्री लिखित ग्रामीण कवितेचे स्वरूप स्पष्ट केले जाईल. स्त्री लिखित ग्रामीण कविता अभिव्यक्त होत असताना ती कशी समृद्ध होत गेली. तसेच बदलत्या सामाजिक जीवनामुळे तिचे जगण्यातील संदर्भ कसे बदलत गेले. स्त्री लिखित कवितेतील कृषी जाणिवांचे बदलते जीवनानुभूतीचा विचार केला जाणार आहे. स्त्री म्हणून तिचे काव्यातील संदर्भ शोधताना तिचे भावविश्व अभ्यासता येईल इत्यादी विचार या प्रकरणामध्ये केला जाणार आहे.

प्रकरण तिसरे :- एकविसाव्या शतकातील स्त्री लिखित कवितेतून व्यक्त होणारी कृषी जाणिवा

प्रस्तुत प्रकरणामध्ये एकविसाव्या शतकातील स्त्री लिखित कवितेतून व्यक्त होणारी कृषी जाणिवा यांचा अभ्यास करता येईल. एकविसाव्या शतकातील जागतिकीकरणाचा कृषी संस्कृतीवरती झालेला परिणाम. बदलते ग्रामजीवन, बदलते सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व आर्थिक बाबींचे काव्यातून अभिव्यक्त होणारे स्त्री जाणिवा अभ्यासता महापूर, शेतकऱ्यांच्या आत्महत्या यांचा स्त्री मनावरती झालेला परिणाम त्यातून बदलती कृषी जाणीवा तपासता येईल. शेतकरी व मजूर यांचे चित्रण स्त्री लिखित कवितेतून व्यक्त होत गेले हे पाहता येईल. वरील सर्व कृषी जाणिवांचा अभ्यास या प्रकरणांमध्ये केला जाणार आहे.

प्रकरण चौथे :- स्त्री लिखित ग्रामीण कवितेची भाषाशैली

एकविसाव्या शतकातील स्त्री लिखित ग्रामीण कवितेतून अविष्कृत होणारी भाषा ही तिच्या प्रादेशिकता अंगाने वेगळी ठरते. त्यानुसार तिचे भाषासौंदर्य अभ्यासता येईल. बदलते जीवन आणि बदलती भाषा यांचे वैविध्य अभ्यासता येईल. स्त्री लिखित कवितेतून अविष्कृत झालेली भाषेची मौखिक संस्कृती, बोलीभाषा, वाक्प्रचार, म्हणी, ग्रामीण शीवी, उखाणे, ओवी यातून व्यक्त होणारी स्त्री सुलभ कृषी जाणिवेचे दर्शन अभ्यासता येईल. परंपरा व आधुनिकता यांचा भाषाशैलीतील मिलाफ अभ्यासता येईल.

प्रकरण पाचवे :-   उपसंहार

मराठी साहित्यातील ग्रामीण कवितेचा एकविसाव्या शतकातील स्त्री लिखित निवडक कवितेतील कृषी जाणिवांच्या संदर्भात वरील प्रकरणाच्या माध्यमातून जो अभ्यास केला जाणार आहे. त्याच्या आधारे निष्कर्ष काढून त्याचे विश्लेषणात्मक मांडणी सदरचे प्रकरणामध्ये करण्यात येईल.

आधारभूत कवितासंग्रहाची सूची :

१. ‘स्त्री कोष’ - स्वाती शिंदे-पवार, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे - 2005

२. ‘फुटवे’ - संजीवनी तडेगावकर, उर्मी प्रकाशन, जालना - 2007

३. ‘सिझर कर म्हणतेय माती’ - कल्पना दुधाळ, नवसिद्धांत प्रकाशन, नाशिक - 2010

४. ‘बाप’ - लता ऐवळे - निर्मिती प्रकाशन, कोल्हापूर - 2012

५. ‘माती मोकळी होताना’ - स्वाती शिंदे-पवार, प्रतिमा पब्लिकेशन्स, पुणे - 2013

६. ‘माळशेज घाटातल्या कविता’ - डॉ. उर्मिला चाकूरकर, संवेदना प्रकाशन, पुणे - 2015

७. ‘धग असतेच आसपास’ - कल्पना दुधाळ, लोकवाड्.मयगृह, मुंबई - 2016

८. ‘वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ’ - अनुराधा पाटील, शब्द प्रकाशन, मुंबई - 2016

९. ‘शेतकऱ्याच्या नारी’ - प्रतिमा इंगोले, सोनल प्रकाशन, पुणे - 2017

१०. ‘कदाचित अजूनही’ - अनुराधा पाटील, शब्द प्रकाशन, मुंबई - 2018

११. ‘काळजाची काही ओळी’ - स्वाती शिंदे-पवार, प्रतिमा पब्लिकेशन, पुणे 2018

संदर्भ ग्रंथ सूची

1. कोत्तापल्ले नागनाथ : 'ग्रामीण साहित्य स्वरुप व शोध', स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, 2007 .

2. गायकवाड हेमलता (डॉ):'आधुनिक मराठी ग्रामीण कविता:एकअभ्यास', फडके प्रकाशन, पुणे, 1999

3. चिमोरे सुशिल प्रकाश (डॉ) : 'साहित्यविविधा आणि समीक्षा, प्रतिमा' पब्लिकेशन, पुणे, 2018.

4. पाडगावकर कांचन (डॉ.) : 'मराठवाड्यातील कवियत्रींची कविता' रूपवेध प्रकाशन, परभणी ,2015.

5. पाटील मोहन : 'ग्रामीण साहित्य आणि संस्कृती' स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, 2013.

6. पाटील म. सु. : 'साहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक अनुबंध', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, 2001.

7. बोराडे रा. रं. : 'ग्रामीण साहित्य' साकेत प्रकाशन', औरंगाबाद, 1992.

8. मुळीक किर्ती (डॉ.) : 'ग्रामीण साहित्याची चळवळ' स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, 2011.

9. मुलाटे वासुदेव : 'ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 1996.

10. मुलाटे वासुदेव (डॉ.) 'ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा' स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, 2005.

11. यादव आनंद : 'सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 2014.

12. यादव आनंद : 'ग्रामीण साहित्य आणि वास्तव', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 1981.

13. रसाळ सुधीर : ‘कविता आणि प्रतिमा’ मौज प्रकाशन, पुणे, 1982.

14. शहाजिंदे फ. म. (संपा.) : ‘मराठवाड्यातील कविता’ निर्मल प्रकाशन , नांदेड, 1998.

15. सार्वेकर कैलास (डॉ.) : ‘मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास’ मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 1999.

टीप : संशोधन अभ्यासांती संशोधन आराखड्यात बदल होऊ शकतो.

संशोधक
श्री. पांडुरंग नारायण पाटील
मु. पो. तांबवे ता. वाळवा जि. सांगली
पिन कोड नं. :- 415 404

मार्गदर्शक
प्रा. डॉ. म. ई. तंगावार
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर, जि. लातूर